# विद्यापीठाच्या हिंदी विभागाला केंद्रीय राजभाषा संस्थानचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**अमरावती, ४ सप्टेंबर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील हिंदी विभागाने राजभाषा हिंदीचा प्रसार व प्रचारासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याकरिता राजभाषा संस्थान नवी दिल्लीकडून 'कार्यालय दीप स्मृती चिन्ह' पुरस्कार देऊन विभागाला पुरस्कृत करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या हिंदी विभागाला राष्ट्रीयस्तरावर मिळालेल्या बहुमानाबद्दल हिंदी विभाग प्रमुख प्रो.डॉ. शंकर बुंदेले यांचे कुलगुरू डॉ. मोहन खेडकर, प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

प्रो.डॉ. शंकर बुंदेले हिंदी विभाग प्रमुख असून, हिंदी विभागाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम व



संशोधनाचे कार्य विभागात निरंतरपणे सुरू असते. विभागात 'राष्ट्रभाषा प्रचार केंद्र' व 'राजभाषा प्रशिक्षण केंद्राची' स्थापना करण्यात आली असून, त्यामाध्यमातून राजभाषा व अनुवाद कार्यशाळा, हिंदी भाषा चर्चासत्र, व्याख्यानमाला, स्पर्धा व संशोधन आणि अध्यापनाचे कार्य निरंतरपणे केल्या जाते.

हिंदी विभागाने राजभाषा हिंदीचा प्रसार व प्रचारासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. एम.ए. अनुवाद हिंदी हा अभ्यासक्रम विभागाद्वारे चालविल्या जातो. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या जवळपास ७० विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या तसेच विविध विभागांमध्ये रोजगारांच्या संधी मिळाल्या आहेत. जवळपास ३५ विद्यार्थ्यांनी विभागांतर्गत आचार्य पदवीसाठी संशोधन करून आचार्य पदवी प्राप्त केली आहे. याशिवाय विभागामार्फत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजनही करण्यात येऊन नावीन्यपूर्ण संशोधनांवर आदान-प्रदान करण्यात आले. याशिवाय विविध ग्रंथांचे समीक्षात्मक प्रकाशन विभागामार्फत झालेले आहे. ■

तरुणभारत दि.०८/०९/१५